नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग, दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०

जाक्र/साप्रवि/आस्था-२ /७१६७ ते ११८४/२०१७
नाशिक दिनांक:- ०३/०७/२०१७

प्रति,

१) खाते प्रमुख ---------------(सर्व)
जिल्हा परिषद, नाशिक

विषय :- आस्थापना विषयक नस्तीवर कार्यवाही करतांना सहा.प्रशासन अधिकारी, कनि. प्रशासन अधिकारी यांनी घ्यावयाच्या दक्षते बाबत.

उपरोक्त विषयानुसार आपणास सुचित करण्यात येत आहे. आपले विभागाकडुन आस्थापना विषयक महत्वाचे निर्णय, नियुक्ती आदेश, पदोन्नती आदेश, शिक्षेचे आदेश, सेवा समाप्तीचे आदेश, परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आणणे, स्थायीत्व प्रमाणपत्र आदेश, सेवा प्रवेशोत्तर परिक्षा सुट, इत्यादी स्वरूपाच्या नस्ती सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर केल्या जातात सद्य:स्थितीत अशा नस्ती संबंधीत विभागाचे खाते प्रमुख हे समक्ष उपस्थित राहून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी दाखल करतात

तथापि सदरचे कार्यपध्दतीत बदल करण्यात येत असुन वरील नमुद आस्थापाना विषयक कामकाजाच्या नस्ती संबंधीत विभागाचे सहा. प्रशासन अधिकारी/कनि.प्रशासन अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाचे अभियाप्रानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस समक्ष दाखल करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. काही नस्तीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विहीत कालमर्यादेत कार्यवाही करणे बाबत निर्देश दिलेले असल्यास त्यांच कालमर्यादेत कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाचे सहा.प्रशासन अधिकारी/कनि.प्रशासन अधिकारी यांची राहील.

3/07

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक